हिंदुस्थान
भारतीय सौर २९ आश्विन १९४६
सुप्रभात
द्वितीय मुखपृष्ठ
epaper : dainikhindusthan.com
email : dainikhindusthan@gmail.com
twitter : twitter.com/HindusthanAmt
अमरावती, मंगळवार १५ ऑक्टोंबर, २०२४

**सुविचार**
दोष लपवला की तो मोठा होतो आणि कबूल केला की नाहीसा होतो.

**अमरावती हवामान**
मंगळवारचा अंदाज
कमाल : ३२ किमान २३

| | |
|---|---|
| नागपूर | : कमाल ३३ किमान २४ |
| पुणे | : कमाल ३१ किमान २२ |
| मुंबई | : कमाल ३२ किमान २६ |
| अकोला | : कमाल ३२ किमान २३ |
| यवतमाळ | : कमाल ३२ किमान २३ |
| वाशिम | : कमाल ३१ किमान २२ |

# महाराष्ट्रातील लाडक्या बहीणींना यापूढे मिळणार ११ हजार मानधन

## राज्य शासनामार्फत दरदिवशी एकवेळ नाश्ता, जेवणासह ४ तास नोकरीची हमी

(पाराशर बुलबुले)

धारणी दि.१४ : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेनंतर आता महिलांना आणखीन एक स्नेहभेट देण्यात येणार असून येत्या १ नोव्हेंबरपासून पात्र महिलांसाठी 'चार तास पार्ट टाइम जॉब वर्क' मधून ११ हजार रुपये मानधनाची शाश्वतीसह एक वेळ मोफत नाश्ता आणि जेवण देण्याची हमी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गोर, गरीब, वंचित घटकातील महिलांना या महत्वकांक्षी योजनेंतर्गत मोठा दिलासा मिळणार आहे.



राज्य सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणल्यानंतर ही योजना महिलावर्गात चांगलीच लोकप्रिय झालेली दिसत आहे. मात्र या योजनेतून महिलांना रोजगार मिळत नाही, महिलांना रोजगार उपलब्ध करून द्या, अशी टीका काही राजकीय पक्ष विरोधकांकडून करण्यात आली होती. त्याच पार्श्वभूमीवर महायुती-भाजप सरकारने आता राज्यभरातील महिलांसाठी नव्या धोरणात्मक पाऊल टाकून 'वर्क टू पार्ट टाइम जॉब' ही संकल्पना जाहीर करण्याची घोषणा केली आहे.

स्त्री सशक्तीकरण व आर्थिक मदतीचा जयघोष देत राज्य सरकारने लाडक्या बहीणींसाठी एक वेळ मोफत जेवणासह फक्त चार तास नोकरीची शाश्वती देत ११ हजार रुपये प्रतीमाह मानधन देणारी ही नवीन योजना महाराष्ट्राच्या धर्तीवर सुरू करण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला आहे.

राज्यातील पात्र लाभार्थी महिलांना यापूढे नव्या धोरणात्मक निर्णयातून थेट 'टाटा कंपनी' मधून नोकरी देण्यात येणार आहे. दरदिवशी फक्त चार तासांच्या या अर्धवेळ नोकरीसाठी महिलांना ११ हजार रुपयांचे मानधन त्यांच्या बॅक खात्यावरच देण्यात येणार असून सोबतच एक वेळचा नाश्ता आणि जेवण सुद्धा कुठेलेच शुल्क न घेता संबंधित महिलांना दिलं जाणार आहे.

राज्याचे उच्च तथा तंत्र शिक्षणमंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांनी यासंदर्भात प्रसार माध्यमांपर्यंत ही माहीती दिली आहे. यामुळे राज्यातील गोर ,गरीब, गरजवंत महिलांना नक्कीच समाधान होणार असून ही महत्वकांक्षी योजना लवकरच संपूर्ण महाराष्ट्रभर लागु करण्यात येणार आहे.

# तीनशे वाहनांची तपासणी, केवळ चार वाहने निघाली ओव्हरलोड

## प्रादेशिक परिवहन विभाग दोन दिवसांपासून तळ ठोकून

नांदगाव पेठ दि. १४ : रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून राखेची वाहतूक करणारे वाहन ओव्हरलोड असल्याची तसेच वाहनांमधून राख उडत असल्याचा प्रकार माध्यमांनी उचलून धरल्यानंतर प्रादेशिक परिवहन विभाग दोन दिवसांपासून रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाच्या परिसरात तळ ठोकून आहे. दोन दिवसांत तीनशे वाहनांची तपासणी करण्यात आली मात्र केवळ चार वाहने ओव्हरलोड असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून तब्बल २ लाख १८ हजारांचा दंड ठोठावण्यात आला.

गेल्या अनेक दिवसांपासून रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पामधून ओव्हरलोड वाहनांमधून राखेची वाहतूक करत असल्याचे तसेच वाहनांमधून राख उडत असल्याने दुचाकीचालक तसेच नागरिकांच्या डोळ्यांवर व आरोग्यांवर केमिकलयुक्त राखेचे परिमाण होत असल्याच्या तक्रारी प्रादेशिक परिवहन विभागाला प्राप्त झाल्या होत्या. खा. डॉ. अनिल बोंडे यांनी देखील प्रशासनाला याबाबत सतर्क केले होते. त्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन विभागाने गत आठवड्यापासून ओव्हरलोड वाहने व राख उडविणाऱ्या वाहनांवर कार्यवाहीचा बडगा उगारला होता.

प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या आदेशानुसार विभागाचे अधिकारी व कर्मचारी याठिकाणी दोन दिवस तळ ठोकून होते.दोन दिवसा तीनशे वाहनांची तपासणी करण्यात आली.यामध्ये केवळ चार वाहने ओव्हरलोड आढळली.प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटर



वाहन निरीक्षक प्रताप राऊत, प्रमोद सरोदे, शिव मवाळ, कृष्णा नेवारे, राहुल मुडे, बलराज गोंडोळे, मो. अतहर यांनी ओव्हरलोड वाहनांवर कायदेशीर कार्यवाही करत चारही वाहनांना २ लाख १८ हजारांचा दंड आकाराला.

**वाहनांची नंबर द्यावी, कार्यवाही निश्चित : प्रताप राऊत**

एका आठवड्यापासून आमची वाहनांवर कार्यवाही सुरू आहे.तुरळक वाहने ओव्हरलोड होती.यामध्ये कायदेशीर कार्यवाही करण्यात आली मात्र गावकऱ्यांना उडणाऱ्या राखेचा यापुढे त्रास झाल्यास त्यांनी तातडीने वाहनांचे नंबर आमच्या विभागाला द्यावे.तक्रारींच्या आधारे त्या वाहनांवर निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल असे मोटर वाहन निरीक्षक प्रताप राऊत यांनी यावेळी सांगितले.

# प्राथमिक शिक्षक समितीच्या विषय नियामक सभेची कार्यकारीणी घोषीत

## अध्यक्षपदी अजयानंद पवार व सरचिटणीसपदी शैलेंद्र दहातोंडे



अमरावती दि.१४ : प्राथमिक शिक्षक समितीची विषय नियामक सभा नुकतीच पार पडली. त्यामध्ये जिल्हाध्यक्ष पदी अजयानंद पवार,जिल्हा सरचिटणीस पदी शैलेन्द्र दहातोंडे,कार्याध्यक्ष पदी प्रशांत निमकर तर कोषाध्यक्षपदी नंदकिशोर पाटील आणि कार्यालयीन चिटणीस मनिष काळे ,महीला आघाडी प्रमुख पदी सरीता काठोळे तर सरचिटणीस पदी विनिता घुलक्षे यांची निवड करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती अमरावती जिल्हा शाखेची विषय नियमक सभा रविवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी सुयोग मंगल कार्यालय अमरावती येथे संपन्न झाली. या सभे करीता विषय नियामक सभा निरिक्षक म्हणुन राज्याध्यक्ष विजय कोंबे, सहनिरिक्षक प्रशांत निंभोरकर (वर्धा जिल्हा कार्यालयीन चिटणीस), पवन बानोकर (वर्धा जिल्हा समाज माध्यम प्रभारी) राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, राज्य महीला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे, जिल्हाध्यक्ष गोकुलदास राऊत, जिल्हा सरचिटणीस संभाजी रेवाळे,जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, जिल्हा कोषाध्यक्ष नंदकिशोर पाटील, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख शैलेन्द्र दहातोंडे, महीला आघाडी प्रमुख सरीता काठोळे,कोषाध्यक्ष भावणा ठाकरे, जुनी पेन्शन आघाडी प्रमुख अल्हाद तराळ, सरचिटणीस प्रेमसुख ठोंबरे,कार्याध्यक्ष निलेश कांडलकर,कोषाध्यक्ष पंकज दहीकर,सेवानिवृत्त समितीचे जिल्हाध्यक्ष अशोक पारडे उपस्थित होते.कै.भा.वा.शिंपी गुरुजी यांच्या फोटोचे पुजन करुन हारार्पण करण्यात आले. मान्यवरांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.सभेचे प्रास्ताविक संभाजी रेवाळे यांनी तर सुत्रसंचालन शेलेन्द्र दहातोंडे यांनी आभार प्रदर्शन अजयानंद पवार यांनी मानले.

यावेळी जिल्हा नुतन कार्यकारीनी निवड करण्यात आली.या मध्ये जिल्हा शाखेचे अध्यक्ष म्हणून अजयानंद पवार (अचलपूर) आणि सरचिटणीस म्हणून शैलेंद्र दहातोंडे (भातकुली) यांची सर्वानुमती निवड करण्यात आली.जिल्हा नेते म्हणून मावळते अध्यक्ष गोकुलदासजी राऊत आणि जिल्हा सल्लागार म्हणून मावळते जिल्हा सरचिटणीस सदानंद जी रेवाळे यांची निवड झाली. जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, जिल्हा कोषाध्यक्ष नंदकिशोर पाटील,जिल्हा कार्यालय चिटणीस मनीष काळे यांची निवड झाली.

महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष म्हणून सरिता काठोळे, सरचिटणीस विनिता गुलक्षे यांची निवड करण्यात आली.यावेळी वंदना बंड कु. विद्या रा. कोथळकर सौ. रुपाली भा. राऊत सौ. सरिता काठोळे जि सौ. सरिता पाचघरे सौ. तारा भाकरे कु. लता टेंभरे, भावना श्री. ठाकरे कु सुरेखा सौ विनिता घुलते सौ.संगिता तडस सौ. लिनता अ.पवार,नितिन देशमुख, जयेश प्र. दाभाडे ,रामेश्वर आठवले,रत्नाकर पडोळे, रविद्र सु.श्रीखंडे, प्रमोद रा. ढाकुलकर, राजेश रतनलाल गुप्ता,विनोद पाल,संदीप कविटकर, विजय बा.सरोदे,शामकांत तडस, प्रफ्फुल्लकुमार वाठ,उमेश चुनकीकर,प्रफुल्ल होले,अकल उघडे,सुनील रा. बोकाडे, ज्ञानेश्वर लांजेवार वैजनाथ फड, राहुल रा. वानखडे , निलेश स. कोडलकर, रामचंद्र महादेव चव्हाण, रमेश अजाबराव झाकर्डे, विजय खोडस्कर, सौ. वंदना गावडे, सौ. संध्या पाटील, स्वाती चव्हाण, सुशिला आत्राम, चंद्रकांत कुळकर,विजय राऊत,जगदिश वानखडे, मनिष येवले,विलास चौखंडे गजानन कावलकर, नंदकिशोर रायबोले,इंदिरा रेवसकर,अर्चना शुक्ला, जयश्री सोळंके,प्रणाली मालधूरे, द्वारका सरिमा गाडगे , भारती शु: राणे, सौ: सरिता,सौ.तारा बि. भाकरे, सौ. दिपाली के मोडेकर, सौ. सोनाली से धोटे कु. विद्या कोळमकर कु. जयश्री रा. शेकार, नितीन सा देशमुख, नितिन अविनाशे, संजय शेलोकार, धनंजय डांगे, योगीराज मोहोड, विवेक ठाकरे सह सर्व तालुका शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी पर्वा निमित्य रावळगाव ते गुरुकुंज मोझरी पालखी पदयात्रेचे प्रस्थान

(किशोर मोकलकर)

आसेगाव पूर्णा दि. १४ : दरवर्षी प्रमाणे दि. १८ ऑक्टोंबर २०२४ ला वर्ष (५१) वे रावळगाव येथून ब्रम्हलीन सद्गुरू संत श्री तुकडोजी महाराजांच्या ५६ वा पुण्यतिथी महोत्सव निमित्य गुरुकुंज मोझरी, जि. अमरावती येथे जाण्यासाठी शेकडो गुरुदेव भक्तांच्या सहभागामध्ये गावा-गावातून ग्रामगीता तत्वज्ञान आचार महायज्ञ व श्री गुरूदेव सेवामंडळचा प्रचार प्रसार करण्यासाठी पालखी पदयात्रा शिबिर महोत्सवा साठी रावळगाव येथुन पंचकोशीतील शेकडो गुरूदेवभक्त भजन दिंडीच्या गजरात, मोठ्या उत्साहात पालखी पदयात्रे चे प्रस्तान करणार आहे.

पालखी पदयात्रा ही १८ ऑक्टोबर ला रावळगाव येथुन सकाळी ११ वाजता निघून २० ऑक्टोबरला श्री. गुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी येथे पोहोचणार, दोन दिवस पालखी पदयात्रेकरू गुरुकुंजात थांबून २१ ऑक्टोबरला सायं ४.५८ ला आश्विन वद्य पंचमीला वं. महाराजांना मौन श्रद्धांजली अर्पण करणार आहे . या पुण्यपर्वावर अनेक सेवकांना, कार्यकर्त्यांना नवीन प्रेरणा स्फूर्ती मिळते, २२ आक्टोबरला गुरुकुंज मोझरी येथून



रावळगाव करीता पालखी पदयात्रा वापस निघणार, दि. २३ आक्टोबरला पालखी पदयात्रा समारोपीय कार्यक्रम रावळगाव येथे आयोजित केला आहे. या पालखी पदयात्रेत सामुदायिक ध्यान- प्रार्थना, सत्संग व ग्रामगीताप्रणित गांव स्वछता,स्वावलंबी, स्वयंशासित व स्वयंपूर्ण ,श्रमदान ग्रामगीता तत्वज्ञान आचार महायज्ञ होणार आहे. कोवीड काळ वगळता अखंड वारी पायदळ जाणे व पायी वापस येणे करीत आहे.

**पालखी प्रस्थान मार्ग**

हि पालखी रावळगाव येथून आसेगाव पुर्णा, कुष्णापुर, साऊर, शिराळा, यावली, डवरगाव, गुरूकुंज मोझरी ३५ ते ४० किलोमीटरचा प्रवास करणार आहे. तेव्हा या अमृतमय सत्संग योगाचा लाभ घेण्याकरिता पालखी पदयात्रेत बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मानवता सेवा सप्ताहाअंतर्गत लायन्स क्लब ऑफ अमरावतीतर्फे ८०० लोकांना अन्नदान

अमरावती दि.१४ : मानव सेवा सप्ताहाअंतर्गत लायन्स क्लब ऑफ प्रिमियम अमरावती कडून दिवसाला एका जेवणासाठी नानक रोटी ट्रस्टच्या सहकार्याने गुरुवारी रात्री सुमारे ८०० लोकांना अन्न दान करण्यात आले.

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या लायन्स क्लब ऑफ प्रिमियम अमरावतीतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. मानसेवा सप्ताहाअंतर्गत नानक रोटी ट्रस्टच्या सहकार्याने ८०० लोकांना अन्नदान करण्यात आले. सोबतच खाऊ वाटप, किराणा वाटप व चहा वाटप करण्यात आले. विलासनगर चौक, पंचवटी चौक, इर्विन चौक, रेल्वे स्टेशन चौक, कव्हर नगर मार्गे दस्तूर नगरपर्यंत खाऊचे वाटप करण्यात आले.या सेवेत नानक रोटी ट्रस्टचे सेवादार आणि लायन्स क्लब प्रीमियमचे सदस्य,डॉ लक्ष्मीकांत राठी,राजेंद्र जाधव,डॉ निक्कू खालसा,डॉ पंकज गुंडियाल,अध्यक्ष राहुल चढ्ढा,सचिव ऋषभ चांडक,कोषाध्यक्ष अरुण काळबांडे, रतनदीप सिंग बग्गा,राज सिंग





छाबरा,रोहित खुराणा,रवीश सरवैया,संजय देशमुख,अभिमन्यू राठी,कपिल खरपे,मनीष खंडेलवाल,पियुष अडवाणी,सोहित चौधरी,करण वर्मा,अमायरा खुराना उपस्थित होते.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा सोने अर्पण सोहळा व सीमोल्लंघन कार्यक्रम

## शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला सोने व पुष्पचक्र अर्पण

अमरावती दि. १४ : श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा सोने अर्पण सोहळा व सीमोल्लंघन विजया दशमीला शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती केंद्राच्या परिसरात पार पडला.संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे व आमदार सौ.सुलभाताई खोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पचक्र व सोने अर्पण केल्यानंतर



खा.बळवंत वानखडे, आ.सौ.सुलभाताई खोडके आणि अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी उपस्थितांना दसऱ्याच्यान शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याला राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर व ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे व प्रा.सुभाष बनसोड, संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ..पुरुषोत्तम वायाळ व प्राचार्य डॉ.अमोल महल्ले प्रामुख्याने उपस्थित होते.सोहळ्याचे संचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी केले. सर्व उपस्थितांनी एकमेकाला दसऱ्याच्या शुभेच्छा देऊन सोहळ्याचा समारोप झाला.

# विजयादशमी उत्सवानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने मोर्शी नगरात पथसंचलन व शस्त्रपूजन

मोर्शी दि. १४ : विजयादशमी उत्सवानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने मोर्शी नगरात पथसंचलन व शस्त्रपूजन करून उत्सव साजरा करण्यात आला.

विजयादशमी हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्थापना दिवस असून संघाच्या सहा प्रमुख उत्सवापैकी एक प्रमुख उत्सव असून त्यानिमित्त समाजाला संघाच्या कार्याची प्रत्यक्ष ओळखव्हावी म्हणून जाहीर कार्यक्रमाचे आयोजन या निमित्याने करण्यात आले होते. संघटित हिंदू समाजाचे प्रगटीकरण म्हणून भारतभर संघाचे स्वयंसेवक पथसंचलन करीत असतात. राष्ट्रसेवेची भावना जागवत शिस्तबद्ध पद्धतीने घोष आणि एकाच गणवेशात राष्ट्रीय स्वयं सेवक संघ मोर्शी नगराचा रविवारी सायंकाळी ७ वाजता गजानन कॉलनी येथील गजानन महाराज मंदिरापासून घोषपथक सहीत अर्थात वाद्यवृंद पथसंचालनाला सुरुवात झाली असून कृषी उत्पन्न बाजार समिती चौक, छत्रपती




शिवाजी चौक, विद्या कॉलनी, पुनर्वसन कॉलनी या मार्गाने मार्गक्रमण करून शिवपार्वती मंदिरासमोर असलेल्या मैदानात पथसंचालनाचा समारोप करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय विचार मंच विदर्भ प्रांताचे संयोजक सतपालजी सोहळे, प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक नंदूभाऊ नानोटकर, मोर्शी नगर कार्यवाह अजय काळे, मोर्शी तालुका संघ चालक मनोहर घुलक्षे प्रामुख्याने व्यासपीठावर विराजमान होते. उपस्थित मान्यवरां हस्ते शस्त्र पूजन करून डॉ. हेडगेवार व गोळवलकर गुरुजी तसेच भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. यावेळी प्रमुख वक्ते सतपाल सोहळे यांनी संघ १०० व्या वर्षात पदार्पण करत असताना संघाची आगामी काळात कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, समरसता, स्वदेशी नागरिक कर्तव्य अशा पंच परिवर्तनाच्या विषयाला घेऊन समाजात जाऊन व समाजाला सोबत घेऊन काम करू हे विचार व्यक्त केले. यावेळी राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे, पत्रकार मंडळी,नगरातील अनेक गणमान्यांची उपस्थिती होती. अनिरुद्ध अनासने, सुनील मांडवे, आकाश भनेरकर,रितेश गंधे, उज्वल शिरभाते,अथर्व मुकदम,कृष्णा वरवाडे, शौनक देशपांडे यांच्यासह नगरातील नागरिक मातृशक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती पटके यांची रोजगार हमी योजनेच्या जिल्हास्तरीय सदस्यपदी निवड

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

नांदगाव पेठ दि. १४ : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिफारशीनुसार गठीत करण्यात आलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या अमरावती जिल्हा समितीवर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख साहेबराव उर्फ छत्रपती पटके यांची सदस्यपदी निवड करण्यात आली.पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील हे या समितीचे अध्यक्ष आहेत तर जिल्हाधिकारी सौरभ कटीयार हे सदस्य सचिव असणार आहेत.



महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात होणाऱ्या रोहयोच्या कामावर नियोजन व देखरेख करण्यासाठी जिल्हास्तरीय शासकीय समितीचे आज गठन करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिफारशीनुसार अध्यक्षपदी चंद्रकांत दादा पाटील यांची निवड करण्यात आली तर खा.डॉ.अनिल बोंडे यांची सह अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सदस्यपदी आ. प्रताप अडसड,आ. देवेंद्र भुयार, आ. रवी राणा,उमेश ढोणे, नकुल सोनटक्के, साहेबराव उर्फ छत्रपती पटके,अक्षय पवार, स्वाती मुंदडा,वैभव लुंगे, किरण देशमुख,प्रतिभा राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा व सचिवपदी जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांची निवड करण्यात आली.

छत्रपती पटके हे शिवसेनेचे उप जिल्हाप्रमुख असून नांदगाव पेठ ग्रामपंचायतीचे सदस्य आहेत.जिल्ह्यात रोजगार हमी योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी तसेच नियोजनात्मक कामे करण्यासाठी समितीच्या माध्यमातून आपण प्रयत्न करणार आहोत अशी प्रतिक्रिया नवनियुक्त सदस्य छत्रपती पटके यांनी दिली. पटके यांच्या निवडीमुळे शिवसेना शिंदे गट सह राजकीय वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सोहम मालठाणेची राज्य शालेय क्रीडा कबड्डी स्पर्धेत निवड

अमरावती दि.१४ : नुकत्याच मोर्शी या ठिकाणी संपन्न झालेल्या जिल्हा व विभाग स्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये सीताबाई संगई हायस्कूलचा कबड्डीचा खेळाडु सोहम शंकरदादा मालठाणे याची महाराष्ट्र राज्य शालेय क्रीडा कबड्डी स्पर्धे मध्ये पालघर (मुंबई) या ठिकाणी संपन्न होणाऱ्या राज्यस्तर कबड्डी स्पर्धेत निवड चाचणी यकरिता १४ वर्षे वयोगटात निवड झालेली आहे.



सोहम मालठाणे यांच्या यशामुळे सीताबाई संगई हायस्कूलची क्रीडा क्षेत्रातील कबड्डीची परंपरा याही वर्षी कायम राहिली आहे. सोहम आपल्या यशाचे श्रेय त्याचे मार्गदर्शक शारीरिक शिक्षक हेमंत माकोडे, त्याचे वडील/ प्रशिक्षक शंकरदादा मालठाणे, कार्तिकेश चंदनपत्री, शारीरिक शिक्षक विशाल भेलांडे यांना देतो. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे मुख्याध्यापक, विकास घोगरे उपमुख्याध्यापक, राजेश वैद्य पर्यवेक्षक, डॉ. निलेश डहाळे यांनी त्याचे अभिनंदन करून कौतुक केले व पुढील स्पर्धे करता शुभेच्छा दिल्यात. तसेच त्याच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, अविनाश संगई उपाध्यक्ष, डॉ. उल्हास संगई, सचिव विवेक संगई, डॉ. अशोक संगई, जेष्ठ सदस्य मुकुंद संगई, सहसचिव अजय संगई, सहसचिव प्रसाद संगई, विनय संगई, अनुप संगई या सर्वांनी चि. सोहमच्या यशाबद्दल भरभरून कौतुक केले व त्याचे अभिनंदन करून त्यास पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्याच्या या यशा बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.